MHNS240012592021

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०८.०९.२०२१ |
| नोंदणी तारीख | : | ०८.०९.२०२१ |
| निकाल तारीख | : | २१.०५.२०२६ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०४ ०८ १३ |
| निशाणी | | ४५ |

**सटाणा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात**

**ता. बागलाण, जिल्हा– नाशिक.**

(पिठासन अधिकारी – यु.पी. हिंगमिरे)

**नियमीत फौजदारी खटला क्र.२२९/२०२१**

गुन्हा नोंद क्र.५१/२०२०

**फिर्यादी/तक्रारदार** **महाराष्ट्र शासन**
**मार्फत सहाय्यक पोलीस निरीक्षक,**
जायखेडा पोलीस स्टेशन, ता.बागलाण.

**अभियोग पक्षातर्फे** सहाय्यक सरकारी अभियोक्ता
श्री. ए.बी.महाजन.

**आरोपी** **१. गोविंद उर्फ गोंदु भाऊराव चौधरी,** वय ४२ वर्षे,
**२. गोकुळ गोविंद चौधरी,** वय २१ वर्षे
दोघे रा. भिमखेत, ता. सटाणा, जि. नाशिक.

**आरोपींतर्फे विधीज्ञ** श्री. एस. एस. शिंदे.

**भाग – ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | १६.०२.२०२० |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | १८.०२.२०२० |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २४.०३.२०२१ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | १७.०३.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १७.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | –– |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | २१.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## <u>आरोपींची माहिती</u>

| आ. क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अतिंम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्या बाबत कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गोविंद ऊर्फ गोंदु भाऊराव चौधरी | २२.०२.२०२० | -- | भादवी कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| २. | गोकुळ गोविंद चौधरी | | | | | निरंक | निरंक |

## भाग – क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष –**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | वसंत शामु महाले | फिर्यादी | ३६ |
| २. | गंगुबाई वसंत महाले | साक्षीदार | ३८ |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| –– | –– | –– | –– |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ०१ | दोषारोपपत्र |
| २. | ३७ | फिर्याद (सहीपुरते) |

## न्यायनिर्णय

**(घोषणा तारीख – २१.०५.२०२६.)**

प्रस्तूतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ या अपराधासाठी चालविण्यात आला.

**०२. अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

फिर्यादी वसंत शामु महाले याने जायखेडा पोलीस ठाणे येथे अशा आशयाची फिर्याद दिली की, दि.१६.०२.२०२० रोजी १६.०० वा.चे सुमारास मौजे वाघंबा गावात फिर्यादी व फिर्यादीची पत्नी असे शेतात काम करीत असतांना आरोपी नं.०१ च्या मुलाला फिर्यादीची मुलगी न दिल्याच्या कारणावरुन आरोपी क्र.०१ ने त्याचे हातातील काठीने फिर्यादीच्या पत्नीला कांबीवर मारहाण केली. त्यावेळी फिर्यादी भांडण सोडविण्यास गेले असता, आरोपी क्र.०२ ने त्याच्या हातातील काठीने फिर्यादीस मारहाण करुन शिवीगाळ केली व फिर्यादीचे कपडे फाडुन नुकसान केले व तुम्ही येथे कसे राहतात असा दम दिला.

**०३.** सदरची फिर्याद गुन्हा रजिस्टर नंबर ५१/२०२० ने नोंदविली. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला, तपास टिपणे नोंदविले आणि आरोपींना अटक केली व तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** या प्रकरणात मी आरोपींवर (निशाणी २९) द्वारे भा.द.वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवला व तो आरोपींना मराठीत वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी त्यांचे वरील सर्व आरोप नाकारले व सुनावणीला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

०५. सदर प्रकरणामध्ये फिर्यादीने निशाणी ३४ समजुत पुरसीस व निशाणी ३९ वर पुरसीस दाखल करुन त्यास जादा पुरावा देणे नाही, अशी पुरसीस दिल्याने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींविरुद्ध कोणताही पुरावा आलेला नसल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

०६. अभिलेख, पुरावे व उभय बाजूंचे युक्तीवाद पाहता, सदर प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे निघतात, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय की, आरोपींनी त्यांच्या समान उद्येशाने मुलगी न दिल्याच्या कारणावरुन फिर्यादी व त्याच्या पत्नीला काठीने मारहाण करुन आपखुशीने दुखापत पोहोचविली ? | **...नकारार्थी.** |
| २. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय की, आरोपींनी त्यांच्या समान उद्येशाने मुलगी न दिल्याच्या कारणावरुन फिर्यादी व त्याच्या पत्नीला हाताचापटीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन आपखुशीने दुखापत पोहोचविली ? | **...नकारार्थी.** |
| ३. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय की, आरोपींनी त्यांच्या समान उद्येशाने, शांतता भंग करण्याच्या उद्देशाने फिर्यादी व साक्षीदारास शिवीगाळ केली व अपमानित केले ? | **...नकारार्थी.** |
| ४. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय की, आरोपींनी त्यांच्या समान उद्येशाने, फिर्यादी व साक्षीदार यांना जीवे मारण्याची धमकी दिली ? | **...नकारार्थी.** |
| ५. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>युक्तिवाद</u>

०७. अभियोगपक्षातर्फे विधीज्ञ श्री. ए. बी. महाजन आणि आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. शिंदे यांचा युक्तीवाद ऐकला.

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्रमांक १ ते ५ करिता –</u>

०८. सर्व मुद्दे हे परस्पर संलग्न असल्यामुळे त्याचे विवेचन एकत्रीत केलेले आहे. फिर्यादी वसंत शामु महाले (सा.क्र.०१) याने त्याच्या पुराव्यात कथन केले आहे की, तो आरोपींना ओळखतो. त्यांच्यात व आरोपींमध्ये किरकोळ कारणावरुन वाद झाले होते. त्यामुळे रागाच्या भरात त्याने आरोपींविरुद्ध जायखेडा पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिली होती. त्याने फिर्यादीवरील त्याची सही ओळखली. परंतु, त्यातील मजकुर माहित नसल्याची कबुली दिली आहे. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य न केल्याने तिला उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आलेत, परंतु तिच्या पुराव्यातुन अभियोगपक्षास सहाय्य होईल अशी कोणतीही बाब अभिलेखावर आली नाही. त्यामुळे सदर फिर्यादीचा पुरावा अभियोपक्षास उपयोगाचा ठरला नाही.

०९. गंगुबाई वसंत महाले (सा.क्र.०२) हिच्या पुराव्यात असे आले की, फिर्यादी तिचे पती आहेत. तिच्या पतीमध्ये व आरोपींमध्ये किरकोळ कारणावरुन वाद झाले होते. त्यामुळे तिच्या पतीने आरोपींविरुद्ध जायखेडा पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती. तसेच पोलीसांनी तिची विचारपुस केली नव्हती व जबाब नोंदविला नव्हता असे कथन केले आहे. तसेच तिला सदर घटनेत मारहाण झाली नव्हती असे देखील कथन केले आहे. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य न केल्याने तिला उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आलेत. परंतु, तिच्या साक्षीतुन अभियोगपक्षास सहाय्य होईल अशी कोणतीही बाब अभिलेखावर आली नाही.

१०. पटलावरील एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता, फिर्यादी, साक्षीदार व आरोपी यांची न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याची दिसुन येते. त्याबाबत त्यांनी संयुक्त पुरसीस नि.क्र.३४ दाखल केली आहे. पटलावरील उपलब्ध पुराव्या वरुन आरोपींनी त्यांच्या समान उद्येशाने फिर्यादीने मुलगी दिली नाही याचा राग येवुन आरोपींनी फिर्यादीस व साक्षीदारास काठीने मारहाण करुन

आपखुशीने दुखापत केली, आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारास हाताच्या चापटीने मारहाण करुन आपखुशीने दुखापत केली, त्यांना शिवीगाळ करुन अपमानीत केले व फौजदारीपात्र धाकदपटशा केल्या इत्यादी बाबी संशयाच्या पलिकडे जावुन सिध्द होत नाहीत. सबब, मी मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ चे निष्कर्ष **नकारार्थी** देत आहे.

**मुद्दे क्र.०५ करीता** :–

**११.** मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ च्या निष्कर्षावरुन अभियोगपक्ष आरोपींवरील दोषारोप सिध्द करु शकला नसल्याने आरोपींची निर्दोष मुक्तता करणे न्यायसंगत वाटते. सबब, मी मुद्दा क्रमांक ०५ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

१. **आरोपी नं.०१ व ०२** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन मुचलके रद्द करण्यात येतात.

३. जप्त मुद्येमाल एक दोन फुट लांबीची जंगली काठी मुल्यरहित असल्याने अपील कालावधीनंतर तिची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणेत यावी.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी दिलेले बंधपत्र व जामीनदाराचे जामीनखत अपील कालावधीपर्यंत ग्राह्य राहिल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

UDAY PRAKASH HINGMIRE
Digitally signed by UDAY PRAKASH HINGMIRE
Date: 2026.05.21 17:44:50 +0530

**दिनांक – २१.०५.२०२६.** **( यु. पी. हिंगमिरे )**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट नं.२,**

**सटाणा.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer (Grade-III) | : Pratik S. Kale. |
| Court | : Jt.C.J.J.D. & J.M.F.C. |
| Date of Order/Judgment | : 21.05.2026. |
| Order signed by the Presiding Officer on | : 21.05.2026. |
| Order uploaded on | : 21.05.2026. |